International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.3 Jan – Feb 2023

# कल्याणकारी बौध्द धम्म

**डॉ. योगेश एसमुनेश्वर .**
अनिकेत समाजकार्य महाविद्यालय दयाल नगर, वर्धा
*Corresponding Author-* **डॉ. योगेश एसमुनेश्वर .**
Email id: Yogeshmuneshwar70@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.7593647**

प्राचिन भारतामध्ये वैदिक विचारधारा आणि अवैदिक विचारधारा यांचा प्रभाव संपूर्ण सामाजिक व्यवस्थेमध्ये दिसून येतो .जे वेदाचे प्रामाण्य मान्य करतात ती वैदीक विचारधारा आणि जे वेदाचे प्रामाण्य नकारतात ते अवैदिक विचारधारा . अवैदिक विचारधारेमध्ये भगवान बुध्द, भगवान महाविर व चार्वाक यांचा समावेश प्रामुख्याने होतोभारतात वैदिक विचारधारेने . सामाजिक व्यवस्थेत चार्तुवर्णीय व्यवस्थेला जन्म दिला आणि चातुवर्णीय व्यवस्थितेमुळे कर्मकांड, जातीभेद, असमानता इत्यादी इत्यादी बाबीला जन्म दिलाहि व्यव .स्था असमानतेवर आधारित होतीब्राम्हण ., क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी विभागणी या व्यवस्थेची करण्यात आली होतीप्रत्येक वर्णाच्या कार्य निश्चितीमुळे त्याला .प्रत्येक वर्णाचे कार्य निर्धारीत करण्यात आले होते . आणि ही चाकोरीबध .चाकोरीचे स्वरूप प्राप्त झाले होते्द व्यवस्था कोणीही मोडू शकत नव्हतेवर्णव्यवस्थेतील सर्वात खालच्या . वर्णवस्थेतील सर्वात खालच्या .वर्गाला म्हणजेच शुद्राना वरील तिन्ही वर्गाची सेवा करणे अनिर्वाय होते हे निश्चित करण्यात आले त्याची सा .वर्गाला त्यांच्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित ठेवण्यात आलेमाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय आयुष्य उध्वस्त करण्यात आलेअर्थातच ही .स्त्रीयांची सुध्दा परीस्थिती काही वेगळी नव्हती .त्यांना गुलामाचे जिवन व्यतीत करावे लागत असे . .सर्व व्यवस्था ही शोषक आणि शोषीत यावर आधारित होती अवैदिक विचारधारेवर आधारित बौध्द धम्म हा मानवतावाद, स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधूत्व या तत्वावर आधारीत असून मानवी जीवनाचे कल्याण हा त्याचा अविभाज्य असा अंग आहे, प्रज्ञा, शिल, करूणा ही बौध्द तत्वज्ञानाचा पाया आहेप्रज्ञा म्हणजे ज्ञान होय परंतु हे ज्ञान चित्ताच्या एकाग्रतेतुन सत्याचे झालेले . ज्ञान होयमैत्रिपुर्ण व सकारात्मक विश्वव्यापी नाते जोडण्यासाठी सत्याचे परिपूर्ण आकलनाची गरज असते आणि ते प्रज्ञेतुन प्राप्त . शिलधारक समाज हा आर्दश समाज असतो अशा समाजात मैत्रीपूर्ण संबंध .सामाजिक जिवनात शिलाचे महत्व असते .होते एकमेकाबद्दल आदर असतो यामुळे .असतातसुयोग्य समाज व पर्यायानी संघटीत राष्ट्र निर्माण होवू शकतेबौध्द तत्वज्ञान हे . .जगातिल सर्वात पहिले वैज्ञानिक तत्वज्ञान आहे आणि हे विश्वातील सर्व विचारवंतानी स्वीकृत केले आहे

**पंचशिलः**

सामाजिक जिवनामध्ये अनेक दुःख आहेत . मानवाने आपले जिवन हे मैत्रीपूर्ण, आनंददायी व दुःख विरहीत जिवन जगण्याकरीता बौध्द धम्मातील पंचशिलाचे पालन महत्व ठरत आहेपंचशिल ही आचरणातील . जिवीत हिंसा .नियमावली आहे, चोरी करणे, व्यभिचारापासून अलिप्तता, खोटे बोलण्यापासून दूर राहणे आणि मादक पदार्थाच्या सेवनापासून दूर राहणे हीच पंचशिलाची शिकवण आहेहे पाचही शिल ग्रहण करणारा . व्यक्ती शिलवान बनतो व असा व्यक्ती सुख व समाधानाने स्वतःच्या कल्याणासोबतच इतरांचे .जिवन व्यतित करतो .कल्याणही या पंचशिलाच्या आचरणातून होत असते

**चार आर्यसत्य:**

1. जगात दुःख आहे,

आजार, मृत्यु, वैफल्य व आवश्यक वस्तुची अप्राप्ती म्हणजेच दुःख व हे दुःख दैनदिन जिवनाशी निगडीत आहे.

2. त्या दुःखाला कारण आहे,

तिव्र इच्छा हीच दुःखाचे मुळ कारण आहे.

3. हे कारण म्हणजे तृष्णा होय

लोभ, व्देष, तिव्र इच्छा याचा नाश करणे.

4. आणि दुःख निवारण्याचा मार्ग आहे.

नितीचा विकास आणि त्याचा आचरणात वापर करून मनुष्य निर्धारीत ध्येय गाठू शकतोया करीता अष्टांगिक . .मार्गाची आवश्यकता असते

**अष्टांगिक मार्गः**तथागत गौतम बुध्दांनी संागितलेला - काम, क्रोध, व्देष इदोष दूर करून जीवन निर्मळ करण्याचा . या अष्टांगिक मार्गास मध्यम मार्ग .सदाचाराचा मार्ग आहे .सुध्दा म्हणतात

1.सम्यक दृष्टीःनिर्सग नियमाविरूध्द कोणतीही गोष्ट होवू - .शकते ही गोष्ट न मानणे म्हणजेच सम्यक दृष्टी होय

2. सम्यक सकल्पःयोग्य निर्धार -, विचार म्हणजेच सम्यक संकल्प होय.

3. सम्यक वाणीःकरूणायुक्त व सत्यपूर्ण वाचा ठेवण्याचा - .प्रयत्न करणे म्हणजे सम्यक वाणी होय

4. सम्यक कर्मः उत्तम कर्म व योग्य कृत्ये करणे म्हणजे - .सम्यक कर्म होय

5. सम्यक उपजिविकाःवाईट मार्गाने आपली उपजीविका - न करता तीसन्मार्गानेच करणे म्हणजे सम्यक उपजिविका होय.

6. सम्यक व्यायामःवाईट विचार निर्माण झाल्यास त्याचा - .त्वरित नाष करणे म्हणजेच सम्यक व्यायाम होय

7. सम्यक स्मृतीःतात्विक गोष्टीचे स्मरण करून चित्तास - .जागृत ठेवणे म्हणजे सम्यक स्मृती होय

8. सम्यक समाधीकोणत्य -:ाही वाईट विकारांना स्पर्ष होवू न देता दुष्ट प्रवृत्तीपासून मन अलग ठेवून चित्त प्रसन्न आणि शांत ठेवणे हे सम्यक समाधी होय.

**दहा पारमिता:**

1.शिल 2. दान 3. उपेक्षा 4. नैष्क्रिम्य 5. विर्य 6. शांती 7. सत्य 8. अधिष्ठान 9. करूणा 10. मैत्री

मानवाने वैयक्तीक व सार्वजनीक आयुष्य व्यतीत करतांना बौध्द तत्वज्ञानाचा अवलंबन केल्यास त्यास दुःखापासून मुक्ती व निर्वाणाचा मार्ग मिळतोस्वतःच्या . कल्याणा सोबतच इतरांचे कल्याण सुध्दा यामध्ये अंतर्भूत .हा बहुजन हिताय व बहुजन सुखाय याचा मार्ग आहे .आहे बौध्द धर्माच्या विचारसरणीला प्रभावीत होवून सम्राट अशोकाने हिंसेचा त्याग करून कल्याणकारी बौध्द धम्माची कास धरलीसम्राट अशोकाने बौद्ध धर्माला आपल्या शासन . व्यवस्थेमध्ये संपूर्ण स्थान दिल्यामुळे सम्राट अशोकाचे शासन समानता .व्यवस्था ही लोककल्याणकारी झाली, न्याय व मानवतावाद यावर आधारित शासन व्यवस्था ही दीर्घकाळपर्यंत अबाधित राहते कारण की लोककल्याण हा या शासन व्यवस्थेचा गाभा असल्यामुळे शासन सुचारू पद्धतीने चालत असते व अशा राज्यातील जनता सुख, शांती आणि समाधानाने नांदत असतात. आजचे आधूनिक युग हे कमालीचे भौतिकवादी दिसून येतेयामुळे आर्थिक दरी . मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेमानवी जीवनात . .आर्थिक बाबींचा सर्वदूर परिणाम दिसून येत आहे यामुळे .आत्मकेंद्रित व भोगवादी प्रवृत्ती निर्माण झाली आहे त्यामुळे आजच्या .भविष्यात अराजकता निर्माण होऊ शकते आधुनिक युगात बौद्ध धम्माचे महत्व आधिक जाणवू दुसरीकडे बुद्ध धम्माची समता .लागलेले आहे, स्वातंत्र, बंधुता आणि सामाजिक नीतिमत्ता या माध्यमाने या भौतिक परिस्थितीवर मात करता येतेआईन्स्टाईन च्या . सापेक्षवादाच्या सिध्दांतावरून हे स्पष्ट होते की भौतिक पदार्थ आणि ऊर्जा यामध्ये जोपर्यंत संतुलन आहे तोपर्यंत संतुलन साधण्याकरीता बौध्दाचा .विश्वाचे संतुलन आहे मध्यम मार्ग हा अत्यंत प्रभावी व कल्याणकारी मार्ग आहे . .अती भौतिकवाद हा मानव विनाशाकडे नेणारा मार्ग आहे

भारतीय संविधानाच्या कलम 51 क नुसार (ज) भारताच्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे की त्यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुध्दी व सुधारणावाद यांचा विकास करणेजीवनातील प्रत्येक . क्षेत्रामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारणे अत्यंत आवश्यक अवैज्ञानिक दुष्टी अधर्म .आहे, अंधविश्वास, कर्मकांड या गोष्टीला जन्म देते तर चांगले कर्म हे प्रत्येक वेळी कामात कल्याणकारी असतेवाईट कर्म हे व्यक्तीला दुःख आणि . क्लेष देतेवाईट कर्माचा परीणाम हा वाईट होतो व ते . अवैज्ञानिक दृष्टीकोन दैवी प्रकोप .भोगावे लागतात, तंत्र मंत्र, कर्मकांड, पूजा अर्चना, व्रत, दैवी शक्ती, अलौकिक शक्ती, यज्ञ, बळी, अनिष्ट परंपरा यामध्ये विश्वास निर्माण करतो व त्याचा परिणाम दुःखामध्येच होतोवैज .्ञानिक दृष्टी ही सुख सुविधा प्रगती कल्याणकारी कष्टाहारी, दुःख निवारण याबाबत बाबीवर लक्ष देतेव्यक्ती आपली बहुमूल्य . शक्ती व राष्ट्रीय संपत्ती ही या कर्मकांडावर खर्च करत .असतो

**समारोप:** बौध्द धम्मातील तत्वज्ञान, पंचशिल, चार आर्य सत्य, आर्य अष्टांगीक मार्ग, दहा पारमिता याचे पालन करून व समाज व्यवस्थेत त्या उपयोग करून संघटीत, मैत्रिपूर्ण समाज निर्माण करणे आवश्यक आहेशासन . व्यवस्थेत बौध्द धम्मातील तत्वज्ञानाचा वापर करून कल्याणकारी राज्याची संकल्पना पूर्णतःस येणे ही काळाची बौद्ध धम्मातील वैज्ञानिक दृष .गरज आहे्टिकोनाचा करून सामाजिक बांधिलकी निर्माण करणे आवश्यक आहे .

**सदर्भः**


1. साप्ताहिक माझी जनता आक्टोबर-1999
2. सजग प्रहरी एप्रिल-1998
3. साप्ताहिक जयभिम-2005
4. https://agnialok.com/theology-and-buddha/
5. https://thespiritualindia.com/
6. https://divyamarathi.bhaskar.com/news/EDT-bhagwan-gautam-buddha-is-great-philosopher-4271286-NOR.html
7. https://www.aajtak.in/education/history/story/history-of-buddhism-213708-2014-07-01